स्थायी समिती
दाखल विषय – दि. २७/२/२०१८

विषय क्रमांक :– २२३९ त्वर्य

पुणे, पेठ बाणेर स.नं. १७६(पैकी) येथील ३० मी.डी.पी.रस्त्याचे ४१४.०३ चौ.मी. क्षेत्र मालमत्ता व व्यवस्थापन विभागामार्फत दि. २/१/२०१८ रोजी पुणे महानगरपालिकेच्या ताब्यात घेण्यात आलेले आहे. तसेच दि. ३०/६/२०१६ रोजी मिळकत पत्रिकेवर व ७/१२ उताऱ्यानुसार पुणे महानगरपालिकेच्या नावाची नोंद झालेली आहे. सदर मिळकतीचा भूसंपादनाचा उद्देश टी.डी.आर. ने जागा ताब्यात आल्याने पुर्ण झालेला आहे. बाणेर स.नं. १७६(पैकी) संयुक्त मोजणी विवरणपत्रानुसार एकच मिळकतधारक बाधीत होत असल्याने बाणेर स.नं. १७६(पैकी) या मिळकतीतील संपुर्ण बाधीत क्षेत्राच्या भूसंपादनाची चालू असलेली कार्यवाही रद्द करणे आवश्यक आहे. त्यानुसार सदर मिळकत भूसंपादनाच्या कार्यवाहीतुन वगळणेस व त्यानुसार मा.जिल्हाधिकारी, पुणे व विशेष भूमि संपादन अधिकारी क्र. १५, पुणे यांना कळविणेस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/भूसंपादन/१०७४ दि. २३/२/२०१८ चे पत्र.

विषय क्रमांक :– २२४० त्वर्य

पुणे महानगरपालिकेसाठी बॅकहो लोडर खरेदी करणे (बी–२ पध्दतीने) कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.इफिशियंट क्रेन सेल्स् ॲण्ड सर्व्हिस, पुणे यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे असल्याने त्यांचेकडून १ नग बॅकहो लोडर करीता बेसिक र.रुपये १६,९५,०००/– २ नग बॅकहो लोडर करीता बेसिक र.रुपये ३३,९०,०००/– + जीएसटी १८% र.रुपये ६,१०,२००/– एकूण र.रुपये ४०,००,२००/– (अक्षरी रक्कम रुपये चाळीस लाख दोनशे फक्त) पर्यंत जीएसटी व सर्व खर्चासह खरेदी करणेस व त्याकामी त्यांचेबरोबर करारनामा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/मोवावि/१०७५ दि.२३/२/२०१८ चे पत्र.

विषय क्रमांक :– २२४१ त्वर्य

नगर रस्ता शार्दुल बाबा दर्गा चौक ते खराडी बायपास (गुंजन चौक ते शास्त्री नगर चौक दरम्यान व वडगाव शेरी फाटा चौक ते ९ बी आर डी पर्यंत फुटपाथ सायकल ट्रॅक विकसित करणे व तदनुषंगिक कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.न्यु इंडिया कन्स्ट्रक्शन कंपनी यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.१०,१२,८१,९९१/– पेक्षा १९.०६% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.८,१९,७७,६४३=५१ उपलब्ध तरतुदीपर्यंत काम करून घेणेस अधिक टेंडर अटीशर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांच्याशी करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पथ/१०७६ दि. २६/२/२०१८ चे पत्र.

विषय क्रमांक :– २२४२ त्वर्य

पेडेस्ट्रीयन पॉलिसी व अर्बन स्ट्रीट डिझाईन गाईडलाईन प्रमाणे कुमठेकर रोड वरील पदपथांची सुधारणा करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.सदानंद जोशी यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.१,४९,९९,८५९/– पेक्षा १७.४०% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.१,२३,८९,८८३=५३ पर्यंत काम करून घेणेस, टेंडर अटीशर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांच्याशी करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पथ/१०७७ दि. २६/२/२०१८ चे पत्र.

विषय क्रमांक :– २२४३ त्वर्य

सिंहगडरोड क्षेत्रिय कार्यालयाअंतर्गत पडीक हद्दीतील सार्वजनिक स्वच्छता व झाडणकाम आऊटसोर्सिंग पध्दतीने करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.अंबिका एंटरप्रायजेस यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.९५,००,०००/– पेक्षा १२.९९% जादा) असल्याने त्यांचेकडून र.रु.१,०७,३३,५५९=६९ पर्यंत काम करून घेणेसाठी व त्यांचेशी करारनामा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/परिमंडळ–३/१०७८ दि. २६/२/२०१८ चे पत्र.

विषय क्रमांक :– २२४४ त्वर्य

प्रभाग क्र. ४१ क कोंढवा बुा गोकुळनगर, येवलेवाडी, कोंढवा बुा, टिळेकरनगर परिसरामध्ये ड्रेनेज लाईन टाकणे व रस्ते विकसित करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ८ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.निलेश तरवडे कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.४९,९९,९५१=२३ पेक्षा ३४.४४% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.३२,७७,९६८=०३ पर्यंत अधिक सर्वसाधारण व विशेष भाववाढ सुत्रानुसार येणारी फरकाची जादा रक्कम देणेस अगर

कपात करणेस व त्यांचेशी करारनामा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/मलनि:सारण/१०७९ दि. २६/२/२०१८ चे पत्र.

विषय क्रमांक :– २२४५ त्वर्य

प्रभाग क्र. ४१ ड मध्ये विविध ठिक़ाणी ड्रेनेज लाईन टाकणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ९ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.निलेश तरवडे कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.३९,९९,९७२=१० पेक्षा ३४.४४% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.२६,२२,३८१=७१ पर्यंत अधिक सर्वसाधारण व विशेष भाववाढ सुत्रानुसार येणारी फरकाची जादा रक्कम देणेस अगर कपात करणेस व त्यांचेशी करारनामा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/मलनि:सारण/१०८० दि. २६/२/२०१८ चे पत्र.

विषय क्रमांक :– २२४६ त्वर्य

प्रभाग क्र. २५ ड मध्ये विकसीत होत असलेल्या उद्यानामध्ये स्थापत्य विषयक कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ६ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.व्ही.ॲण्ड व्ही असोसिएट्स यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.४२,५९,३०४/– पेक्षा १६.६५% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.३५,५०,१२९=८८ पर्यंत काम करुन घेणेस व त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/उद्यान/१०८१ दि. २६/२/२०१८ चे पत्र.

विषय क्रमांक :– २२४७ त्वर्य

कै.बाळासाहेब ठाकरे उद्यान डहाणूकर कॉलनी, कोथरुड येथे स्थापत्य हॉर्टीकल्चर, विद्युत विषयक व सुशोभिकरण अंतर्गत विविध विकास कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.व्ही.ॲण्ड व्ही असोसिएट्स यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.४९,९९,४३५/– पेक्षा २५.६५% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.३७,१७,०७९=९२ उपलब्ध तरतुदीपर्यंत काम करुन घेणेस व त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/उद्यान/१०८२ दि. २६/२/२०१८ चे पत्र.

विषय क्रमांक :– २२४८ त्वर्य

नगररोडवडगांवशेरी क्षेत्रिय कार्यालयाअंतर्गत आऊटसोर्सिंगनेकचरा संदर्भात कामे करुन घेणे हे काम अत्यावश्यक बाब म्हणून दि. १/९/२०१७ रोजी पासून अखंडीत स्वरुपात करुन घेणेत आलेले असल्याने या कामी टेंडर्स मागविली असता ठेकेदार मे.राहुल सर्व्हीसेस यांचे एकच टेंडर आले (टेंडर र.रु.९४,९९,५६६=०६ पेक्षा १३.००% जास्त) असल्याने त्यांचेकडून र.रु.१,०७,३४,५०९=६५ पर्यंत काम करून घेणेसाठी व त्यांचेशी करारनामा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/परिमंडळ–१/१०८३ दि. २६/२/२०१८ चे पत्र.

विषय क्रमांक :– २२४९ त्वर्य

प्रभाग क्र. ३८ क मधील कात्रज स.नं. २२ येथील ॲमिनिटी स्पेसमध्ये जागेवर बहुउद्देशिय इमारत व क्रिडा संकुल उभारणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.शारदा कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.९९,०१,४३१/– पेक्षा २४.३०% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.७४,९५,३८३=२६ अधिक भाववाढ सुत्रानुसार आणि विशेष भाववाढ सुत्रानुसार निर्धारित केलेल्या सिमेंट व लोखंड यांचे बेसिक दरातील प्रत्यक्ष फरकानुसार होणारी वाढ अथवा घट ही अट स्विकृत करुन होणाऱ्या कमी/अधिक रक्कमेपर्यंत काम करुन घेणेस व त्यापोटी त्यांचेशी करारनामा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/भवन/१०८४ दि. २६/२/२०१८ चे पत्र.

विषय क्रमांक :– २२५० त्वर्य

प्रभाग क्र. १२ क मधील धोकादायक पोल शिफ्ट करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ७ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.पी.डी.कुदळे इलेक्ट्रिक यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.५०,००,०००/– पेक्षा ३२.९९९९% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.३३,४९,९६८=८२ पर्यंत काम करुन घेणेस व त्यांचेशी त्यापोटी करार करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/विद्युत/१०८५ दि. २६/२/२०१८ चे पत्र.

विषय क्रमांक :– २२५१ त्वर्य

प्रभाग क्र. १३ ड म्हात्रे पुल ते राजाराम पुल रस्ता हायटेन्शन लाईन अंडरग्राऊंड करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.पी.डी.कुदळे इलेक्ट्रिक यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.९४,९५,५३९/– पेक्षा ३१.९९९९९% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.६४,५६,९६७=४७ पर्यंत काम करुन घेणेस व त्यांचेशी त्याप्रमाणे करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/विद्युत/१०८६ दि. २६/२/२०१८ चे पत्र.

विषय क्रमांक :– २२५२ त्वर्य

पुणे महानगरपालिकेच्या राजीव गांधी रूग्णालय व सोनावणे प्रसुतिगृह येथे नवजात अर्भक (N.I.C.U.) अतिदक्षता विभाग सुरू करणेसाठी वैद्यकीय उपकरणे खरेदी करणे (टेंडर क्रमांक ५७ सन २०१७–१८) कामी निविदा मागविण्यात आल्या असता एकूण ६ निविदा प्राप्त झाल्या असून ज्या ज्या ठेकेदारानी ज्या ज्या उपकरणासाठी सर्वात कमी दर दिलेला आहे त्यांच्याकडून त्या त्या उपकरणांची खरेदी करण्यात येणार असून पात्र पाच निविदाधारक १. ऑस्टीन हेल्थ केअर यांचेकडून रक्कम रूपये २५,९०,७७०/– २. एल्मेड यांचेकडून रक्कम रूपये ८,८७,०४०/– ३.क्वॉलीसर्ज सर्जिकल्स प्रा.लि.यांचेकडून रक्कम रूपये ३३,०६,१६६/– ४ वैभव एजन्सी यांचेकडून रक्कम रूपये ६२,५९३=५० पैसे– ५.योगा एंटरप्राईजेस यांचेकडून रक्कम रूपये ७,०८,०००/– अशी एकुण रक्कम रूपये ७५,५४,५६९= ५० पैसे (अक्षरी रक्कम रूपये पंच्याहत्तर लाख चोपन्न हजार पाचशे एकोणसत्तर आणि पन्नास पैसे फक्त) मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे विषयपत्रासोबत जोडलेल्या खरेदी तक्त्यात नमुद केल्याप्रमाणे पुणे महानगरपालिकेच्या राजीव गांधी रूग्णालय व सोनावणे प्रसुतिगृह येथे नवजात अर्भक (N.I.C.U.) अतिदक्षता विभाग सुरू करणेसाठी वैद्यकीय उपकरणे खरेदी करणेस आणि अर्थशिर्षकावर बिलांची रक्कम खर्ची टाकून त्यांचे बिल अदा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/आरोग्य/१०८७ दि. २७/२/२०१८ चे पत्र.

विषय क्रमांक :– २२५३ त्वर्य

पुणे महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रामध्ये महिलांकरीता कर्करोग तपासणी कार्यक्रम राबविणे (टेंडर क्रमांक ६१ सन २०१७–१८) कामी निविदा मागविण्यात आल्या असता एकूण ४ निविदा प्राप्त झाल्या असून सर्वात कमी दर देणारे निविदाधारक डॉ.शेखर रमेश कुलकर्णी यांचेकडून पुणे महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रामध्ये महिलांकरीता कर्करोग तपासणीचे काम स्कोप ऑफ वर्कमध्ये नमुद केल्याप्रमाणे प्रति महिला रक्कम रूपये २८०/– प्रमाणे रक्कम रूपये ४५,००,००० /– (अक्षरी रक्कम रूपये पंचेचाळीस लाख फक्त) पर्यंत डॉ.शेखर रमेश कुलकर्णी यांचेकडून काम करून घेण्यास व त्यांच्याशी आवश्यक तो करार करणेस आणि अर्थशिर्षकावर बिलांची रक्कम खर्ची टाकून त्यांचे बिल अदा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/आरोग्य/१०८८ दि. २७/२/२०१८ चे पत्र.

विषय क्रमांक :– २२५४ त्वर्य

पुणे शहरातील मुख्य रस्त्यावरील बीआरटी मार्गावरील पोल उभे करणे तसेच एल ई डी दिवे प्रणाली विद्युत व्यवस्था सक्षम करण्यासाठी आर्थिंग करणे तसेच नवीन पोल बसवून विद्युत व्यवस्था करणे व इतर तद्नुषंगिक कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ६ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.पी.डी.कुदळे इलेक्ट्रिक यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.८०,००,०००/– पेक्षा ३४.९९९९९% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.५२,००,०००=८० पर्यंत काम करुन घेणेस व त्याप्रमाणे त्यांचेशी त्यापोटी करार करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/विद्युत/१०८९ दि. २७/२/२०१८ चे पत्र.

विषय क्रमांक :– २२५५ त्वर्य

शरद पवार ॲकडमी ऑफ लर्नींग स्कुल वडगाव (बु) येथे विद्युत विषयक कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.एम.एस.इलेक्ट्रिकल्स यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.७७,७०,२८४/– पेक्षा १०.३४५६७% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.६९,६६,३९६=०६ पर्यंत काम करुन घेणेस व त्यांचेशी त्यापोटी करार करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/विद्युत/१०९० दि. २७/२/२०१८ चे पत्र.

विषय क्रमांक :– २२५६ त्वर्य

प्रभाग क्र. ३९ अ,ब,ड मधील प्रभागातील धनकवडी स्मशानभुमी मध्ये विविध विकासाची सुधारणा कामे करणे व तदनुषंगिक कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.दी रायकॉन कन्स्ट्रक्शन्स यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.९९,९७,०१२=९९ पेक्षा २०.८२% कमी) असल्याने त्यांचेकडून पुर्वगणनपत्रक र.रुपये ९९,९८,०००/– अधिक भाववाढ सुत्रानुसार आणि विशेष भाववाढ सुत्रानुसार निर्धारित केलेल्या सिमेंट व लोखंड यांचे बेसिक दरातील प्रत्यक्ष फरकानुसार होणारी वाढ अथवा घट ही अट स्विकृत करुन होणाऱ्या कमी/अधिक रक्कमेपर्यंत काम करुन घेणेस व त्यापोटी त्यांचेशी करारनामा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/भवन/१०९१ दि. २७/२/२०१८ चे पत्र.

विषय क्रमांक :– २२५७ त्वर्य

खडकवासला येथून येणाऱ्या पाण्यासाठी अस्तित्वातील जलवाहिनीवर सुधारणा विषयक कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्सपैकी ठेकेदार अजय आनंद बापट यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.४६,३०,८७६/– पेक्षा ५.४०% जास्त) असल्याने त्यांचेकडून र.रु.४८,८०,९४३=३० पर्यंत काम करुन घेणेसाठी त्यांचेशी करारनामा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पापु/१०९२ दि. २७/२/२०१८ चे पत्र.

विषय क्रमांक :– २२५८ त्वर्य

पाणी पुरवठा विभागाच्या २४X७ प्रकल्पाच्या अनुषंगाने पुणे मनपाच्या हद्दीतील १२ मी.रुंदीच्या आतील रस्त्यांचे तसेच १२ मी. व त्यापेक्षा जास्त रुंदीच्या रस्त्यांच्या ओव्हर ले काँक्रीट/टीडब्ल्युटी काँक्रीटीकरण करावयाच्या प्रस्तावित कामांबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/पथ/१०९३ दि. २७/२/२०१८ चे पत्र.

विषय क्रमांक :– २२५९ त्वर्य

प्रभाग क्र. ०९ क बालेवाडी भारती विद्यापीठ चौक १०० फुटी डी.पी.रोड ते एफ.रेसिडेन्सी ६० फुटी डी.पी.रोडपर्यंत मुख्य जलवाहिनी टाकणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.जितु विजय भालेराव यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.२९,९९,९५३/– पेक्षा १६.०७% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.२५,१७,८६०=५५ पर्यंत अधिक भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रांनुसार होणारी जादा रक्कम आदा/कमी होणारी रक्कम वसूल करुन येणाऱ्या रकमेपर्यंत काम करून घेणेस व त्याांचेशी करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/पापु/१०९४ दि. २७/२/२०१८ चे पत्र.

विषय क्रमांक :– २२६० त्वर्य

शिवाजी रस्ता फडगेट पोलिस चौकी ते राष्ट्रभुषण चौक रस्ता डांबरीकरण करणे कामी टेंडर्स मागविली असता ठेकेदार मे.देवकर अर्थमुव्हर्स यांचे एकच टेंडर आले (टेंडर र.रु.१,४९,३८,१७०/– पेक्षा ९.६७% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.१,३४,९३,६४८=९६ पर्यंत काम करून घेणेस, टेंडर अटीशर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांच्याशी करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पथ/१०९५ दि. २७/२/२०१८ चे पत्र.

विषय क्रमांक :– २२६१ त्वर्य

एस.एन.डी.टी.कॉलेज ते रेस्कॉन कंपनी दरम्यानची (कर्वेरोडमध्ये) १२०० मि.मी. व्यासाची जुनी प्रिस्टेस्ड लाईन बदलुन नवीन एम.एस.पाण्याची पाईप लाईन टाकणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.गुडविल कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.२,००,७६,४१३=५० पेक्षा ९.०% जास्त) असल्याने त्यांचेकडून र.रु.२,१८,८३,२९०=७१ पर्यंत काम करुन घेणेसाठी त्यांचेशी करारनामा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि/ज) यांचे जा.क्र. मआ/पापु/१०९६ दि. २७/२/२०१८ चे पत्र.

विषय क्रमांक :– २२६२ त्वर्य

पुणे मनपाचे विविध वाहनतळामध्ये देखभाल दुरुस्ती, विद्युत विषयक व शौचालय उभारणी इ.काम करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ६ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.गाजुल कंन्सट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.५९,८८,९३०/– पेक्षा २५.२२% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.४४,७८,५२१=८५ पर्यंत तसेच इतर निविदा शर्तीनुसार काम करुन घेऊन देयक अदा करणेस यांस अधिन राहुन त्यांचेबरोबर करारनामा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पापु/१०९७ दि. २७/२/२०१८ चे पत्र.

विषय क्रमांक :– २२६३ त्वर्य

प्रभाग क्र. ३४ क सनसिटी ३० मी.डी.पी.रस्ता अर्बन स्ट्रीट डिझाईन गाईड लाईननुसार विकसीत करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.आदर्श कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.९८,१२,४२५/– पेक्षा ५.१५% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.९३,०७,०८५=११ उपलब्ध तरतुदीपर्यंत काम करून घेणेस अधिक टेंडर अटीशर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांच्याशी करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पथ/१०९९ दि. २७/२/२०१८ चे पत्र.

विषय क्रमांक :– २२६४ त्वर्य

महापौर विकास निधीतून करावयाची कामे – पुणे शहरातील विविध रस्ते व चौकांमध्ये नाम फलक बसविणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ६ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.निखील एन्टरप्रायजेस यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.२,१८,८७,५२२=९४ पेक्षा ४.६७% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.२,०८,६५,३७५=६२ अधिक निविदा शर्तीप्रमाणे सर्वसाधारण भाववाढ सुत्रानुसार येणारी रक्कम कमी/अधिक करणे तसेच इतर निविदा शर्तीनुसार काम करुन घेऊन देयक अदा करणे यांस अधिन राहुन त्यांचेबरोबर करारनामा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/प्रकल्प/११०० दि. २७/२/२०१८ चे पत्र.

(टिप :– ऑनलाईन निविदा मागविली असता दोन निविदा धारकांचे अनुक्रमे मे.निखील एन्टरप्रायजेस व मे.राजेश एन्टरप्रायजेस यांचे निविदा दर एक समान ४.५% कमी दराने असल्याने, संबंधितांमार्फत पुनश्च सिलबंद पाकिटमध्ये निविदा दर मागवून उघडणेत आले असता मे.निखील एन्टरप्रायजेस – ४.६७% कमी दराने व मे.राजेश एन्टरप्रायजेस – ४.५९% कमी दराने असे दर प्राप्त झाले आहेत.)

विषय क्रमांक :– २२६५ त्वर्य

पुणे महानगरपालिकेच्या क्षेामध्ये समाविष्ट करण्यात आलेल्या एकूण ११ ग्रामपंचायतींबाबत मुख्य लेखा व वित्त विभागाशी संबंधित मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रासोबत जोडलेला प्राथमिक अहवाल अवलोकन करुन त्याची नोंद घेण्याबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/मुले/११०१ दि. २७/२/२०१८ चे पत्र.

विषय क्रमांक :– २२६६ त्वर्य

प्रभाग क्र. २५ क मध्ये विविध ठिकाणी विद्युत वाहीन्या भूमिगत करणे व विविध ठिकाणी विद्युत विषयक कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ९ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.शांती इलेक्ट्रिकल्स यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.३९,८७,७५०/– पेक्षा ९.७८% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु. ३५,९७,७४८=०५ पर्यंत काम करून घेणेस व त्यांचेशी त्यापोटी करार करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/विद्युत/११०२ दि. २७/२/२०१८ चे पत्र.

विषय क्रमांक :– २२६७ त्वर्य

पुणे महानगरपालिकेच्या मुख्य इमारतीस रंगकाम व दुरुस्ती करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ८ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.पंडित लक्ष्मण उंदरे यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.९२,४३,२००/– पेक्षा ३०.३३३% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.६४,३९,४६०=१४ पर्यंत अधिक भाववाढ सुत्रानुसार आणि विशेष भाववाढ सुत्रानुसार निर्धारित केलेल्या सिमेंट व लोखंड यांचे बेसिक दरातील प्रत्यक्ष फरकानुसार होणारी वाढ अथवा घट ही अट स्विकृत होऊन टेंडर अटी शर्तीनुसार काम करून घेणेस व त्यापोटी त्यांचेशी करारनामा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/भवन/११०३ दि. २७/२/२०१८ चे पत्र.

विषय क्रमांक :– २२६८ त्वर्य

कार्यकारी अभियंता झोन क्र. ७ च्या अंतर्गत सेवा वाहिन्यांसाठी खोदलेल्या ठिकाणी रिइन्स्टेटमेंट ची कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ९ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.श्री.योगेश कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.९९,९९,५३७/– पेक्षा ३३.७६६६% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु. ६६,२३,०३३=३३ पैकी उपलब्ध तरतुदीपर्यंत काम करून घेणेस अधिक टेंडर अटीशर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांचेबरोबर करार करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पथ/११०४ दि. २७/२/२०१८ चे पत्र.

विषय क्रमांक :– २२६९ त्वर्य

आर.टी.ओ. ते आंबेडकर सेतू जहांगीर हॉस्पिटल फुटपाथ करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.भाग्यश्री इन्फ्रा. प्रोजेक्ट्स यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.४९,६६,७७३/– पेक्षा २४.९९९% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु. ३७,२५,१२९=४१ उपलब्ध तरतुदीपर्यंत काम करून घेणेस अधिक टेंडर अटीशर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांचेबरोबर करार करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पथ/११०५ दि. २७/२/२०१८ चे पत्र.

विषय क्रमांक :– २२७० त्वर्य

प्रभाग क्र. १२ क पौड रस्ता ते सुतार दवाखाना ते कर्वे पुतळा सिमेंट काँक्रिट रस्ता करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ६ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.निखील कन्स्ट्र. यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.७,५२,८५,५०१/– पेक्षा ३.०१% कमी) असल्याने त्यांचेकडून पुर्वगणनपत्रक र.रु. ७,५२,८५,५०१/– उपलब्ध तरतुदीपर्यंत काम करून घेणेस अधिक टेंडर अटीशर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांचेबरोबर करार करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पथ/११०६ दि. २७/२/२०१८ चे पत्र.

विषय क्रमांक :– २२७१ त्वर्य

बिबवेवाडी मुख्य रस्ता विकसीत करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.एस. ॲन्ड जे.बिल्डकॉन प्रा.लि. यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. १९,२५,८८,७८२/– पेक्षा ३.००% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.१८,६८,११,११८=५४ उपलब्ध तरतुदीपर्यंत काम करून घेणेस अधिक टेंडर अटीशर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांच्याशी करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पथ/११०७ दि. २७/२/२०१८ चे पत्र.

विषय क्रमांक :– २२७२ त्वर्य

प्रभाग क्र. २१ क कोरेगाव पार्क, घोरपडी येथील विविध वस्ती मध्ये ड्रेनेज लाईन, चेंबर्स दुरुस्ती व रस्ता करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.देवकर ॲन्ड सन्स यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.९९,९९,९९४/– पेक्षा २३.९९९९९% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.७५,९९,९९६=४४ पर्यंत अधिक भाववाढ सुत्रानुसार व विशेष भाववाढ सुत्रानुसार (स्टार रेट) येणारी फरकाची रक्कम देणेस अथवा कपात होणाऱ्या रकमेपर्यंत काम करून घेणेस व त्यांचेशी करारनामा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/मलनि/११०८ दि. २७/२/२०१८ चे पत्र.

विषय क्रमांक :– २२७३ त्वर्य

टिंबर मार्केट रस्ता/नेहरू रस्ता जहांगीर हॉस्पिटल ते रस्ता पेठ पॉवर हाऊस ते भवानी पेठ सेव्हन लव्ह चौक ते गंगाधाम चौक येथे फुटपाथ करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडर्सपैकी ठेकेदार मे. निखिल कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ५,२३,७९,८६५/– पेक्षा ७.६०% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.४,८३,९८,९९६/– उपलब्ध तरतुदीपर्यंत काम करून घेणेस अधिक टेंडर अटीशर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांच्याशी करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पथ/११०९ दि. २७/२/२०१८ चे पत्र.

विषय क्रमांक :– २२७४ त्वर्य

आर्थिक दुर्बल घटक योजनेअंतर्गत टेंडर क्रमांक ३० सन २०१७–१८ मधील मान्य ठेकेदाराकडून मान्य दराने ५० टक्यापर्यंत वाढीव औषधे व इतर साहित्य खरेदी करणेसाठी निविदेतील मान्य ठेकेदार मे.एस.बी.जोशी ॲन्ड कंपनी यांचेकडून जेनेरीक औषधांच्या व इतर साहित्यांच्या छापील किंमतीवर ५०% इतका डिस्कांउट (सूट) व ब्रॅन्डेड औषधांच्या व इतर साहित्यांच्या छापील किंमतीवर २२.४१% इतका डिस्कांउट (सूट) घेउन रक्कम रूपये १,८०,००,०००/– (अक्षरी रक्कम रूपये एक कोटी ऐंशी लाख फक्त) पर्यंत औषधे व इतर साहित्यांची खरेदी करणेस आणि अर्थशिर्षकावर बिलांची रक्कम खर्ची टाकून त्यांचे बिल अदा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/आरोग्य/१११० दि. २७/२/२०१८ चे पत्र.

विषय क्रमांक :– २२७५ त्वर्य

टेंडर क्रमांक ५ सन २०१७–१८ मधील मान्य ठेकेदाराकडून मान्य दराने ५० टक्यापर्यंत बल्क पध्दतीने वाढीव औषधे खरेदी करणेसाठी निविदेतील १४ मान्य ठेकेदार १.फार्मासिया लिंक २.केप्स फार्मा ३.नेहा एंटरप्राईजेस ४.ऑस्टीन हेल्थ केअर ५.जिनोवा बायोटेक ६.न्यु आशापुरी एजन्सी ७.लक्ष्मी मेडिकल्स ८.ओसवाल एंटरप्राईजेस ९.अंबिका ड्रग्ज हाउस १०.ओमनी एंटरप्राईजेस ११.डॉ.सिध्दीज लॅबोरेटरीज १२.श्री विनायक फार्मा १३.कृपा १४.सिध्दीविनायक डिस्ट्रीब्युटर्स यांचेकडून रक्कम रूपये ४,००,००,०००/– (अक्षरी रक्कम रूपये चार कोटी फक्त) पर्यंत एल–१ च्या दराने औषधे खरेदी करणेस आणि अर्थशिर्षकावर बिलांची रक्कम खर्ची टाकून त्यांचे बिल अदा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/आरोग्य/११११ दि. २७/२/२०१८ चे पत्र.

विषय क्रमांक :– २२७६ त्वर्य

प्रभाग क्र. २९ क विद्युत विषयक सुधारणा कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.मोरेश्वर इलेक्ट्रीक कॉर्पोरेशन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.४५,३९,३४६/– पेक्षा ४.५१% ऐवजी तडजोडीने १०% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु. ४०,८५,४११=४० पर्यंत काम करून घेणेस व त्याप्रमाणे त्यांचेशी करार करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/विद्युत/१११२ दि. २७/२/२०१८ चे पत्र.

विषय क्रमांक :– २२७७ त्वर्य

वसुंधरा तळजाई टेकडी येथे सि.सि.टी.व्ही. पुरविणे, बसविणे व कार्यान्वित करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ६ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.एस.बी.देशमुख यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.५२,३६,२९६/– पेक्षा ०.५% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु. ५२,१०,११४=५२ पर्यंत काम करून घेण्यास व त्याप्रमाणे त्यांचेशी करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/विद्युत/१११३ दि. २७/२/२०१८ चे पत्र.

विषय क्रमांक :– २२७८ त्वर्य

प्रभाग क्र. २९ क ओव्हरहेड तारा भूमिगत करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.मोरेश्वर इलेक्ट्रीक कॉर्पोरेशन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.५८,१८,१०२/– पेक्षा २.२५% कमी ऐवजी तडजोडीने १०% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु. ५२,३६,२९१=८० पर्यंत काम करून घेण्यास व त्याप्रमाणे त्यांचेशी करार करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/विद्युत/१११४ दि. २७/२/२०१८ चे पत्र.

विषय क्रमांक :– २२७९ त्वर्य

'' Up gradation of Network Infrastructure, Setting up Network Operations Center (NOC), LAN Network and Access Points at Pune Municipal Corporation'' कामी निविदा मागविल्या असता एकूण ३ निविदा आल्या असून सदर Techno Commercial Evaluation नुसार मे. Monarch Technologies (Pune) Pvt. Ltd. यांना सर्वाधीक गुण प्राप्त झाले असल्याने त्यांचेकडून काम करुन घेण्यासाठी खालील बाबीस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/मावतं/१११५ दि. २७/२/२०१८ चे पत्र.

१. मे. Monarch Technologies (Pune) Pvt. Ltd. यांना कार्यादेश देणेस.
२. मे. Monarch Technologies (Pune) Pvt. Ltd. यांना Up gradation of Network Infrastructure, Setting up Network Operations Center (NOC), LAN Network and Access Points इ. करिता ५ वर्षे कामकाजाकरिता एकूण र. रु. ८,२३,७५,२९०.२४ (अक्षरी र. रु. आठ कोटी तेवीस लाख पंच्याहत्तर हजार दोनशे नव्वद पैसे चोवीस फक्त) सर्व करासहित बिल अदा करणेस.
३. मे. Monarch Technologies (Pune) Pvt. Ltd. यांच्या बरोबर निविदेतील अटी व शर्तीनुसार करानामा करणेस.

४. पुणे महानगरपालिकेच्या भविष्यातील विविध विभागांच्या उद्‌भवणाऱ्या अतिरिक्त गरजेनुसार व आवश्यकतेनुसार निविदेतील प्राप्त झालेल्या दरानुसार मे. Monarch Technologies (Pune) Pvt. Ltd. यांच्यामार्फत Networking components घेणेस व त्याबाबतचे बिल अदा करणेस.

5. सदर कामासाठी होणारा खर्च खालील अर्थशिर्षकावर टाकणेस.
RE11N103
सन २०१७-२०१८
१ मुख्य देखरेख वसुली वगैरे.
'ड' सांख्यिकी व संगणक कार्यालय
३ विशेष प्रकारची हिशोबी कामे संगणकामार्फत करुन घेणे व तद्‌नुषंगिक कामे करणे

विषय क्रमांक :- २२८० त्वर्य

'' Selection of Software Service Provider to Enhance and Maintain Web and Mobile Apps for Pune Municipal Corporation'' कामी निविदा मागविल्या असता एकूण ४ निविदा आल्या असून M/s. Monarch Technologies (Pune) Pvt. Ltd. यांचे दर सर्वात कमी असल्याने त्यांचेकडून काम करुन घेण्यासाठी खालील बाबीस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/मावतं/१११६ दि. २७/२/२०१८ चे पत्र.

१. M/s. Monarch Technologies (Pune) Pvt. Ltd. यांना '' Selection of Software Service Provider to Enhance and Maintain Web and Mobile Apps for Pune Municipal Corporation या निविदेसाठी १ वर्षाकरिता एकूण र. रु. २८,८०,०००/- + सर्व करासहित (र. रु.**३३,९८,४००/-**)निविदेतील अटी शर्तीनुसार आदा करणेस.

२. M/s. Monarch Technologies (Pune) Pvt. Ltd. यांना कार्यादेश देणेस.

३. M/s. Monarch Technologies (Pune) Pvt. Ltd. यांच्या बरोबर निविदा अटी व शर्तीनुसार करारनामा करणेस.

४. सदर कामासाठी होणारा खर्च खालील अर्थशिर्षकावर टाकणेस.
RE11N103
सन २०१७-२०१८
१ मुख्य देखरेख वसुली वगैरे.
'ड' सांख्यिकी व संगणक कार्यालय
३ विशेष प्रकारची हिशोबी कामे संगणकामार्फत करुन घेणे व तद्‌नुषंगिक कामे करणे

विषय क्रमांक :- २२८१ त्वर्य

संपुर्ण पुणे शहरात असलेल्या १५ क्षेत्रिय कार्यालयांतर्गत उपलब्ध होणाऱ्या विविध जागांवर ३५ ठिकाणी सॅनिटरी नॅपकिन्स डिस्पोजेबल यंत्रणा उभारणे, सर्वेक्षण करणे, मुलीना व महिलांना जनजागृती करुन वापरलेल्या सॅनिटरी नॅपकिन्स चे कलेक्शन करणे पुणे शहराच्या १५ क्षेत्रिय कार्यालयांतर्गत उपलब्ध होणाऱ्या विविध जागांवर साठवणूक करणे व सॅनिटरी नॅपकिन्स डिस्पोजेबल यंत्रणेपर्यंत उपलब्ध वाहनातून करुन शास्त्रोक्त पध्दतीने त्याची विल्हेवाट लावणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.श्री.एन्टरप्रायजेस यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.१३,८९,१५,०००/- पेक्षा ५% जास्त) असले तरी सदर काम एल-१ च्या दरात मे.श्री.एन्टरप्रायजेस , श्री.गणेश एंटरप्रायजेस व सुमित फॅसिलिटी प्रा.लि. या तिघांना सम-समान म्हणजेच प्रत्येकी र.रुपये ४,८६,२०,२५०/- (अक्षरी रक्कम रुपये चार कोटी श्याऐंशी लाख वीस हजार दोनशे पन्नास फक्त) त्यांच्या सोबत सन २०१८-१९, २०१९-२०, २०२०-२१ व २०२१-२२ पर्यंत सर्व करांसहित अशा चार वर्षासाठी त्यांचेकडून काम करुन घेणेस व त्यांचेबरोबर करारनामा करणेसाठी एस्टीमेट कमिटीच्या मान्यतेच्या अधीन राहून देण्यास तसेच सदर पुर्वगणनपत्रकात बदल झाल्यास त्याप्रमाणे वर्कऑर्डर देण्याबाबत खात्याने एस्टिमेट कमिटीच्या अंतिम निर्णयाप्रमाणे कार्यवाही करणेस व त्यांनी केलेल्या कामानुसार बिल अदा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/घनकचरा/१११७ दि. २७/२/२०१८ चे पत्र.

विषय क्रमांक :– २२८२ त्वर्य

गिरीधर चौक ते पुनावाला पार्क येथील नव्याने विकसीत होणाऱ्या पदपथावर डेकोरेटिव्ह पोल उभारुन अद्यावत प्रकाश व्यवस्था करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.पवन क्विक सर्व्हिसेस यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.९९,६४,००४/– पेक्षा १०% कमी) (तडजोडीने) असल्याने त्यांचेकडून र.रु.८९,६७,६०३=६० पर्यंत काम करुन घेणेस व त्याप्रमाणे त्यांचेशी करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/विद्युत/१११८ दि. २७/२/२०१८ चे पत्र.

विषय क्रमांक :– २२८३ त्वर्य

पुणे महानगरपालिका कार्यक्षेत्रातील पुणे शहरातील तालमींना अत्याधुनिक व्यायाम साहित्य पुरविणे हया कामाची निकड/तातडी/आवश्यकता असल्याने सदरचे साहित्य महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसूचि ''ड'' प्रकरण ५ संविदा मधील कलम (२) (२) नुसार व्यायाम साहित्य उत्पादक कंपनी मे. ॲरोफिट यांचे अधिकृत स्थानिक पुरवठाधारक मे. आय. सिक्युअर पॉवर टेक्नोलॉजिस (इं) प्रा.लि. यांचेकडून र.रुपये १,००,००,०००/– (अक्षरी र.रुपये एक कोटी फक्त) पर्यंत खरेदी करणेस, त्याप्रमाणे त्यांचेशी करारनामा करणेस तसेच सदर कामापोटी होणारे बिल अदा मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/भांडार/१११९ दि. २७/२/२०१८ चे पत्र.

विषय क्रमांक :– २२८४ त्वर्य

कचरा गोळा करण्यासाठी टेंडर स्पेसिफिकेशनप्रमाणे घंटागाडया (टिपर टाईप) खरेदी करणे (बी–२ पध्दतीने) कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.सेहगल व्हील्स् प्रा.लि., पुणे यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे असल्याने त्यांचेकडून १ नग घंटागाडी (टिपर टाईप) करीता र.रुपये १५,००,०००/– याप्रमाणे १२ नग घंटागाडी (टिपर टाईप) करीता र.रुपये १,८०,००,०००/– (अक्षरी रक्कम रुपये एक कोटी ऐंशी लाख फक्त) पर्यंत जीएसटी व सर्व खर्चासह त्यांचे दरपत्रकामधील सर्व अटी स्विकारुन व टेंडर अटी शर्तींचे अधीन राहून नाममात्र रुपये१०० टेंडर रक्कम घेऊन व टेंडर अनामत रक्कम न घेता खरेदी करणेस व त्याकामी त्यांचेबरोबर करारनामा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/मोवावि/११२० दि.२७/२/२०१८ चे पत्र.

विषय क्रमांक :– २२८५ त्वर्य

कचराडेपोमुळे पिण्याचे पाणी दुषित झालेल्या उरुळी देवाची व शेवाळवाडी येथे दैनंदिन खेपा टँकरने पाणीपुरवठा करणे (२०१७–१८) (भाग–२) कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.एन.वाय.शिवरकर यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.९९,६३,३६०/– पेक्षा २.००७% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.९७,६३,३९५=३६ रकमेपर्यंत काम करुन घेणेसाठी त्यांचेशी करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पापु/११२१ दि. २७/२/२०१८ चे पत्र.

विषय क्रमांक :– २२८६ त्वर्य

कचराडेपोमुळे पिण्याचे पाणी दुषित झालेल्या फुरसुंगी ग्रामपंचायत हद्दीमध्ये दैनंदिन ७० खेपा टँकरने पाणीपुरवठा करणे (२०१७–१८) (भाग–२) कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्सपैकी ठेकेदार जाधव ट्रान्सपोर्ट यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.९७,९०,०००/– पेक्षा १.४९% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.९६,४४,१२९/– रकमेपर्यंत काम करुन घेणेसाठी त्यांचेशी करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पापु/११२२ दि. २७/२/२०१८ चे पत्र.

विषय क्रमांक :– २२८७ त्वर्य

सन२०१७–१८ महापौर चषक विविध क्रीडा स्पर्धा आयोजनाकरिता होणाऱ्या खर्चास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा आयुक्त(वि) यांचे जा.क्र.मआ/क्री.वि./९९२,दि. ७/२/२०१८चे पत्रावर झालेला मा.क्रीडा समिती ठराव क्र.३७ दि.२३/२/२०१८ चा विचारासाठी.

विषय क्रमांक :– २२८८ त्वर्य

सन २०१७–२०१८ साठी पुणे महानगरपालिका हद्दीतील विविध खेळांमध्ये उल्लेखनिय कामगिरी केलेल्या खेळांडूना क्रीडा धोरणानुसार सन २०१७–२०१८ करिता शिष्यवृत्ती व मार्गदर्शक व खेळांडूना पुरस्कार देणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (वि) यांचे जा.क्र.मआ/क्रिडा/१०६८ दि.२२/२/२०१८ चे पत्रावर झालेला मा.क्रीडा समिती ठराव क्र.३७ दि.२३/२/२०१८ चा विचारासाठी.

विषय क्रमांक :– २२८९ त्वर्य

मा.वसंत मोरे यांचे दि.२२/२/२०१८ चे पत्र.

प्रभाग क्र. ४० ड मध्ये खालील विविध विकास कामे करणेसाठी र.रु.२० लाखाचे खालील प्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

अर्थशिर्षक	कमी	अधिक
सन २०१७–१८ चे अंदाजपत्रक, क. अंदाजपत्रक, १.पाणीपुरवठा, पान क्र. २४, अ.क्र. १, शहरामध्ये पाण्याच्या नवीन लाईन विकसित करणे, (यादी क्र. एसपी २), पान क्र.४३, अ.क्र.६३१, प्रभाग ४० ड मध्ये अंजली नगर परिसरात जय मल्हार मंदिर परिसरात पाण्याची लाईन टाकणे.	२० लाख	---
<u>नविन सुचविलेली कामे</u> १.प्रभाग क्र.४० ड मध्ये सच्चाई माता मंदिर परिसरात विविध ठिकाणी पाण्याची लाईन टाकणे. २. प्रभाग क्र.४० ड मध्ये आगम मंदिर परिसरात व विविध ठिकाणी पाण्याची लाईन टाकणे.	--- ---	१० लाख १० लाख

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

विषय क्रमांक :– २२९० त्वर्य

मा.साईनाथ बाबर यांचे दि.२७/२/२०१८ चे पत्र.

प्रभाग क्र. २७ ड मध्ये खालील विविध विकास कामे करणेसाठी र.रु.२० लाखाचे खालील प्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

अर्थशिर्षक	कमी	अधिक
सन २०१७–१८ चे अंदाजपत्रक, १९.भाजी मंडया व पशुवधगृहे, पान क्र. ११२, अ.क्र. ८, शहरामध्ये भाजी मंडई बांधणे/भाजी मंडईमध्ये विकास कामे करणे (यादी एसजे २९), पान क्र.२५०, अ.क्र.१८, प्रभाग क्र. २७ ड मध्ये साईबाबानगर मध्ये अर्धवट असलेले भाजी मंडई काम पूर्ण करणे.	२० लाख	---
<u>नविन सुचविलेली कामे</u> १.प्रभाग क्र.२७ ड मध्ये साईनगर व शिवनेरीनगर मध्ये विविध विकासाची कामे करणे २. प्रभाग क्र.२७ ड मध्ये साईनगर व कोंढवा परिसर मध्ये विविध विकासाची कामे करणे	--- ---	१० लाख १० लाख

विषय क्रमांक :– २२९१ त्वर्य

मा.महेश वाबळे व मा.धनराज घोगरे यांचे दि.२७/२/२०१८ चे पत्र.

प्रभाग क्र. ३५ ड मध्ये विविध विकासाची कामे करणेसाठी र.रु.१० लाखाचे खालील प्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

अर्थशिर्षक	कमी	अधिक
सन २०१७–१८ चे अंदाजपत्रक, १७.खेळ, क्रीडांगणे, पान क्र. ११०, अ.क्र.८, शहरामध्ये क्रिडासंकुल, स्टेडियम उभारणे व विविध विकास कामे करणे (यादी क्र. एसजे २४), पान क्र.२४६, अ.क्र.१४६, प्रभाग क्र. ३५ ड मध्ये आध्यापक ग्राऊंड येथे दुरुस्ती करणे.	१० लाख	---
<u>नविन सुचविलेले काम</u> प्रभाग क्र. ३५ ड मध्ये विविध विकासाची कामे करणे	---	१० लाख

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

विषय क्रमांक :– २२९२ त्वर्य

मा.प्रमोद भानगिरे व मा.अविनाश बागवे यांचे दि.२७/२/२०१८ चे पत्र.

उप आयुक्त क्र.४ (जुना) अंतर्गत क्षेत्रिय कार्यालयामधील सन २०१३–१४, २०१४–१५, २०१५–१६, २०१६–१७ मधील पुर्ण झालेल्या कामांचे परंतू अखर्चित बिले खर्ची टाकणेसाठी र.रू. ३ कोटीचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

अर्थशिर्षक	कमी	अधिक
सन २०१७-१८ चे अंदाजपत्रक, अखर्चित असलेल्या तरतुदी	३ कोटी	---
नविन सुचविलेले काम उप आयुक्त क्र.४ (जुना) अंतर्गत क्षेत्रिय कार्यालयामधील सन २०१३-१४, २०१४-१५, २०१५-१६, २०१६-१७ मधील पुर्ण झालेल्या कामांचे परंतू अखर्चित बिले खर्ची टाकणे	---	३ कोटी

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महापालिका आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

विषय क्रमांक :- २२९३ त्वर्य

मा.अविनाश बागवे, मा.प्रमोद भानगिरे व मा.दिलिप बराटे यांचे दि.२७/२/२०१८ चे पत्र.

नुकत्याच झालेल्या महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेत पैलवान अभिजित कटके याने मानाचा महाराष्ट्र केसरी किताब पटकविला आहे. त्याच्या या गुणांचे कौतुक म्हणून पुणे महानगरपालिकेच्या वतीने रोख रक्कम देऊन व मानचिन्ह देऊन सत्कार करण्यास मान्यता द्यावी.

विषय क्रमांक :- २२९४ त्वर्य

मा.प्रिया गदादे व मा.सौ.मंजुषा नागपूरे यांचे दि.२७/२/२०१८ चे पत्र.

प्रभाग क्र. ३० मधील वारकरी सेवा प्रतिष्ठाण संस्थेमार्फत सामाजिक कार्य केले जाते. सामाजिक कार्य करताना या संस्थेला जागेची नितांत गरज आहे. पुणे महानगरपालिकेच्या जनता सांस्कृतिक हॉल बांधलेला असून याठिकाणी विविध समाजोपयोगी कार्यक्रम चालविले जातात.

तरी सदरचा हॉल प्रभागातील वारकरी सेवा प्रतिष्ठाण या संस्थेबरोबर ३० वर्षे करारनामा करुन नाममात्र भाडयाने देण्यास मान्यता द्यावी.

विषय क्रमांक :- २२९५ त्वर्य

मा.अविनाश बागवे व मा.प्रमोद भानगिरे यांचे दि.२७/२/२०१८ चे पत्र.

प्रभाग क्र.१९ मधील सावित्रीबाई फुले प्रशाला येथील विकसित मैदानावार मनपा शाळेतील विदयार्थ्यांकरिता मोफत फुटबॉल अॅकॅडमी हा संयुक्त प्रकल्प पुणे महानगरपालिका व लहुजी फुटबॉल क्लब यांच्या वतीने राबविण्यास मान्यता द्यावी.

विषय क्रमांक :- २२९६ त्वर्य

मा.अविनाश बागवे यांचे दि.२७/२/२०१८ चे पत्र.

पुणे शहरात पथ विभागामार्फत प्रगतीपथावर असलेले मुख्य प्रकल्प पुणे शहरातील पावसाळी पाण्याचा निचरा होणेसाठी व्यवस्थापन करणे व सातारा रस्ता बी.आर.टी. विकसित करणे ही कामे पावसाळी कालावधी सुरु होणेपूर्वी तातडीने पुर्ण करण्यासाठी सन २०१७-१८ मधील पथ विभागाने इतर प्रकल्पीय कामांसाठी सुचविलेली आर्थिक तरतुद या कामांची शिल्लक राहणारी आर्थिक तरतुद कमी करुन सन २०१७-१८ मधील मुख्य प्रकल्पांकरीता आवश्यक आर्थिक तरतूद प्रशासनाने उपलब्ध करुन देण्यास मान्यता द्यावी.

विषय क्रमांक :- २२९७ त्वर्य

मा.सुनिल कांबळे व मा.सौ.निलिमा खाडे यांचे दि.२७/२/२०१८ चे पत्र.

पुणे महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाकडे कचरा वाहतुक करणेकरिता उपलब्ध असणा-या ७५ BRC पैकी ५० BRC वाहनांचे सरासरी आयुर्मान अजामितीस संपले असल्याने व उर्वरित वाहनांचे आयुर्मान नजिकच्या काळात संपणार असल्याने व यापुढे अशा प्रकारची वाहने पालिकेकडून खरेदी करणे बंद केल्याने नजिकच्या (भविष्यात) काळात कचरा उठावाबाबत अडचणी येण्याची शक्यता विचारात घेवुन उपाय योजना करणे आवश्यक आहे.

पुणे मनपा कार्यक्षेत्रातील घोले रोड/पौड रॅम्पवरील कचरा वाहतूक सह अन्य अनुषंगिक कामे करणेकरिता रॅम्पवरून २४,३३,३६,५०,१००,१५० कि.मी. पर्यंत (येणारे जाणारे अंतर) आश्यकतेनुसार सोईप्रमाणे कचरा वाहतूक खाजगी करणाने मा. स्थायी समिती ठराव क्र. १०३४ दि. २४/०८/२०१६ च्या ठरावानुसार मे. ग्लोबल वेस्ट मॅनेजमेंट सेल प्रा. लि. यांचेकडून करुन घेण्यात येत आहे. त्यांच्याकडून हे काम

समानधानकारक व पुणे महानगरपालिकेस स्वतःची यंत्रणे वापरुन येणा–या खर्चापेक्षा कमी खर्चात होत असल्याने मनपाच्या आर्थिक हितावह होत आहे.

पुणे महानगरपालिकेकडे BRC प्रकारची वाहने, वाहनचालक, सेवक उपलब्ध वाहने खरेदी बाबतचे धोरण, पावसाळयासारख्या ऋतुमुळे होणा–या अडचणी, सणांचे दिवस व शहराची स्मार्ट शहराकडे होवू असलेली वाटचाल विचारात घेत कात्रज रॅम्प व्यतिरिक्त उर्वरित सर्व रॅम्पवरील कचरा वाहतूक व अनुषंगिक कामे कचरा वाहतूक पुणे महानगर पालिकेच्या मालकीच्या वाहना व्यतिरिक्त कमी पडणारी व दैनंदिन कचरा उठावासाठी आवश्यक असणारी वाहने पुढील ५ वर्षांसाठी मा.स्थायी समिती ठराव क्र. १०३४ दि. २४/०८/२०१६ च्या मान्य ठरावामधील २८ Cu.m. टिपरच्या सहाय्याने मान्य अंतरानुसार व दरानुसार मे. ग्लोबल वेस्ट मॅनेजमेंट सेल प्रा.लि. यांचेकडून जसजशी लागतील तसतशी आवश्यकतेनुसार घेवुन त्यांचे समवेत ५ वर्षांकरिता याकामी र.रु. ३० कोटी पर्यंतचा करारनामा करुन घेण्यास मान्यता देण्यात यावी.

विषय क्रमांक :– २२९८ त्वर्य

मा.प्रमोद भानगिरे व मा.अविनाश बागवे यांचे दि.२७/२/२०१८ चे पत्र.

पुणे शहरातील पावसाळी पाण्याच्या व्यवस्थापनासाठी नाला सुधारणा कामे, कल्व्हर्टस व पावसाळी लाईन टाकणे ही कामे पावसाळयापुर्वी पूर्ण करणे आवश्यक आहे. सदरील कामासाठी सन २०१७–१८ मध्ये आवश्यक आर्थिक तरतूद प्रशासनाने खालीलप्रमाणे उपलब्ध करुन देण्यास मान्यता देण्यात यावी.

अ) कात्रज कोंढवा राजस सोसायटी ते शत्रुंजय मंदिर डी.पी.रस्ता विकसित करणे

ब) कात्रज कोंढवा रस्ता शत्रुंजय मंदिर ते मनपा हद्दीपर्यंत डी.पी.रस्ता विकसित करणे
सीई२०अे१२६२/ए९–२८३ या अर्थशिर्षकावरील रक्कम रुपये २० कोटी कमी करुन
पुणे शहराचे स्ट्रॉम वॉटर ड्रेनेज प्रकल्पातील एकोणीस बेसिनमध्ये तातडीने करावयाची कामे या
सीई२०ई१०१/एफ१–६ अर्थशिर्षकावरील रक्कम रुपये २० कोटी उपलब्ध करुन देण्यास

विषय क्रमांक :– २२९९ त्वर्य

मा.प्रिया गदादे व मा.सौ.मंजुषा नागपुरे यांचे दि.२७/२/२०१८ चे पत्र.

मा.स्थायी समिती ठराव क्र. १२२७ दि. ७/११/२०१७ चा फेरविचार करण्यात यावा.

(प्रभाग क्र. ७४ ब(नवीन प्रभाग क्र. ३९ अ ब ५) मधील सर्व्हे नं. ३२ कानिफनाथ चौकातील मनपाच्या आरक्षित असलेल्या जागेवर भाजी मंडई पोलिस चौकी उभारणे व तदनुषंगिक कामे करणे (फेज ३) कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.दि रायकॉन कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.९९,९५,०५८/–पेक्षा २१.८२% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.७८,१४,१३६=३४ ऐवजी पुर्वगणनपत्रक र.रुपये ९९,९९,५००/– पर्यंत टेंडर अटीशर्तीनुसार भाववाढ सुत्र व विशेष भाववाढ सुत्र वगळून काम करुन घेणेस व त्यापोटी त्यांचेशी करारनामा करणेस मान्यता देण्यात यावी.)

विषय क्रमांक :– २३०० त्वर्य

मा.प्रमोद भानगिरे व मा.अविनाश बागवे यांचे दि.२७/२/२०१८ चे पत्र.

मा.स्थायी समिती ठराव क्र. १८१५ दि. ८/१/२०१८ चा फेरविचार करण्यात यावा.

(प्रभाग क्र. १२ क मयुर डी.पी.रोड सिमेंट कॉक्रीट करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.सनराज कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.४,९६,६४,९१८=०० पेक्षा २.३०% कमी) असल्याने त्यांचेकडून पुर्वगणनपत्रक र.रु.४,९६,६४,९१८/– चे दिडपटीपर्यंत टेंडर दराने काम करुन घेणेस अधिक टेंडर अटीशर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांच्याशी करार करण्यास मान्यता देण्यात यावा.)

विषय क्रमांक :– २३०१ त्वर्य

मा.प्रमोद भानगिरे व मा.अविनाश बागवे यांचे दि.२७/२/२०१८ चे पत्र.

मा.स्थायी समिती ठराव क्र. २३५४ दि. ३/१/२०१७ चा फेरविचार करण्यात यावा.

(५०९ चौक ते जकात नाका चौक लोहगाव व डी.पी.रस्ता विकसित करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ६ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.एस.ॲण्ड जे.बिल्डकॉन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.१९,२९,०६,८८२/- पेक्षा २१.२१% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.१५,१९,९१,३३२=३२ च्या दीडपट र.रुपये २२,७९,८६,९९८=४८ पर्यंत काम करून घेणेस अधिक टेंडर अटीशर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांच्याशी करार करण्यास मान्यता देण्यात यावी.)

विषय क्रमांक :- २३०२ त्वर्य

मा.अविनाश बागवे यांचे दि.२७/२/२०१८ चे पत्र.

मा.स्थायी समिती ठराव क्र. ७५७ दि. ७/९/२०१७ चा फेरविचार करण्यात यावा.

(पुणे शहरातील नदी, नाल्यांमध्ये उघडयावर वाहणारे मैलापाणी बंदिस्त नलिकेद्वारे नजिकच्या मैलापाणी शुध्दीकरण केंद्रापर्यंत वाहुन नेणे व तद्नुषंगिक कामे करणे, तसेच पुर्ण झालेल्या कामांचे ५ वर्षे देखभाल दुरुस्ती करणे भाग-अ कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.पाटील कन्स्ट्रक्शन ॲन्ड इन्फ्रास्ट्रक्चर लि. यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ५६,५७,९६,८१९/- पेक्षा ०.१% कमी) असल्याने त्यांचेकडून मूळ पुगप रक्कमेच्या दिडपटपर्यंत र.रु.८४,८६,९५,२२८=५० पर्यंत अधिक भाववाढ सुत्रानुसार व विशेष भाववाढ सुत्रानुसार (स्टार रेट) होणाऱ्या रकमेपर्यंत काम करून घेण्यासाठी तसेच प्रशासनाने आर्थिक तरतुद उपलब्ध करुन देणेस व त्यांचेशी करारनामा करण्यास मान्यता देण्यात यावी.)

विषय क्रमांक :- २३०३ त्वर्य

मा.अविनाश बागवे व मा.प्रमोद भानगिरे यांचे दि.२७/२/२०१८ चे पत्र.

अंशदायी वैदयकीय सहाय योजना व शहरी गरीब वैदयकीय सहाय योजनेअंतर्गत पॅनेलवरील खाजगी रूग्णालयांकडील वैदयकीय उपचारांच्या बिलाच्या परताव्याचे दर अतिशय कमी असून संबंधित दर वाढविणेबाबत रूग्णालय प्रशासनाकडून मागणी होत आहे.

तरी अंशदायी वैदयकीय सहाय योजना व शहरी गरीब वैदयकीय सहाय योजनेअंतर्गत वैदयकीय बिलांचे परताव्याचे दरांमध्ये वाढ करणेस तसेच गर्व्हमेंट शेडयुलमध्ये नसलेल्या लसींच्या लसीकरणाचा/लसीचा समावेश अंशदायी वैद्यकिय सहाय्य योजनेत करणेस मान्यता देण्यात यावी.

विषय क्रमांक :- २३०४ त्वर्य

मा.श्रीनाथ भिमाले, सभागृह नेते, मा.राजेश येनपुरे, मा.दिपक पोटे व मा.सुशिल मेंगडे यांचे दि.२७/२/२०१८ सन २०१७-१८ चे अंदाजपत्रकाच्या तरतूदीनुसार पुणे शहरात विविध विकास कामे करण्यात आली आहेत व करण्यात येत आहेत. या विकास कामांसाठी अंदाजपत्रकीय तरतूदीनुसार व पुर्वगणनपत्रकानुसार टेंडर्स मागविण्यात आली आहेत. या वर्षीचा ट्रेंड पाहता अनेक टेंडर्स ही टेंडररकमेच्या सुमारे १५% ते २०% कमी रकमेची आली आहेत, त्यामुळे ही रक्कम अर्थशिर्षकावर शिल्लक राहिलेली आहेत. या शिल्लक राहिलेल्या रकमेतून र.रुपये १००/- कोटी पुणे शहरातील सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सुधारणेसाठी पुणे महानगर परिवहन महामंडळ लि., पुणे यांना बसेस खरेदी करणेसाठी वर्गीकरणाद्वारे देण्यात यावेत.

विषय क्रमांक :- २३०५ त्वर्य

मा.संजय भोसले व मा.प्रमोद भानगिरे यांचे दि.२७/२/२०१८ चे पत्र.

पुणे महानगरपालिका सन २०१७-१८ च्या आंदाजपत्रकामध्ये सी.ई.२७.ए.२४१/एस.जे.२४-२७६ अन्वये पुणे शहरातील तालीमांना व्यायाम साहित्य पुरविणे या अर्थशिर्षकासाठी रू. १ कोटी तरतुद उपलब्ध आहे.

सदर तालीमांना व्यायाम साहित्य देणगी स्वरूपात देत येत नसल्यास, त्याच तरतुदीनुसार पुणे महानगरपालिकेच्या मालकीच्या विविध प्रभागातील व्यायाम शाळांना अत्याधुनिक व्यायाम साहित्य देण्याबाबतचे संदर्भाकिंत मा.सभासदांचा प्रस्ताव मागे घेण्यास मान्यता देण्यात यावी.

सुनिल पारखी
नगरसचिव,
पुणे महानगरपालिका.